विदर्भ व मराठवाडा विभागातील
कृषीपंपांना वीज जोडणी देण्याबाबत
विशेष योजना.

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१५/प्र.क्र.४५/ऊर्जा-५

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक : ३१ ऑक्टोबर, २०१७.

<u>प्रस्तावना</u> :-

राज्यातील कृषीपंप विद्युत जोडणीची विभागवार अनुशेष भरून काढण्यासाठी सन १९९६ मध्ये मा.राज्यपाल यांनी नियुक्त केलेल्या अनुशेष व निर्देशांक समितीने राज्यातील एकूण १८ जिल्ह्यांमध्ये कृषीपंपाचा अनुशेष दर्शविला होता. सदर जिल्ह्यांमधील कृषीपंपाचा अनुशेष दूर करण्यासाठी “कृषीपंप उर्जीकरणाचा प्रादेशिक असमतोल दूर करणे” या योजनांतर्गत योजनेखालील उपलब्ध तरतुदीतून महावितरण कंपनीस अनुदान देण्यात येते. कृषीपंप वीजजोडणीचा अनुशेष सदर योजनेतून पूर्ण करण्यात येत असला तरी मागील काही वर्षात विदर्भ व मराठवाडयात वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे तेथील शेतकऱ्यांना मोठया आर्थिक संकटाना सामोरे जावे लागले.

२. सन २०१४-१५ व २०१५-१६ या दोन्ही वर्षी राज्यातील पावसाच्या अत्यल्प प्रमाणामुळे राज्याला दुष्काळी परिस्थितीस सामोरे जावे लागले. सततच्या दुष्काळी परिस्थितीमुळे विदर्भ व मराठवाड्यात होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही चिंतेची बाब झाली होती. शासनाने विदर्भातील सहा जिल्हे त्यामुळे आत्महत्याग्रस्त जिल्हे म्हणून घोषित केले होते. विदर्भात व विशेषत: आत्महत्याग्रस्त भागातील शेतकऱ्यांकडून कृषीपंप वीज जोडणीसाठी असलेली मागणी व त्या भागातील पाठपुरावा विचारात घेऊन सदर भागातील शेतकऱ्यांना शासनाने वेळोवेळी विशेष पॅकेज व योजना जाहीर करून त्यांना आर्थिक मदत दिली आहे. या भागातील शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध करून देणे सोयीचे व्हावे याद्दष्टीने तसेच कृषीपंप वीज जोडण्या प्राधान्याने दिल्यास सदर भागातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होईल, याकरिता विदर्भ व मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांना कृषीपंप विद्युत जोडणी प्राधान्याने देण्यासाठी वाढीव निधीची तरतूद करुन योजना राबविण्याची गरज होती. त्या अनुषंगाने सन २०१५-१६ पासून “कृषीपंपाचा प्रादेशिक असमतोल दूर करणे” या योजनेच्या लेखाशिर्षाखाली निधीची तरतूद करुन विदर्भ व मराठवाडा विभागामध्ये कृषीपंप विद्युतजोडणी देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. परंतु सदरची योजना स्वतंत्रपणे राबविण्यासाठी नवीन लेखाशीर्ष उघडून त्याखाली आवश्यक निधीची तरतूद करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्याकरिता याबाबतचा प्रस्ताव दिनांक १०.१०.२०१७ रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता.

शासन निर्णय :-

उपरोक्त प्रस्तावाबाबत मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

१. सन २०१५-१६ पासून "कृषीपंपाचा प्रादेशिक असमतोल दूर करणे" या योजनेच्या लेखाशिर्षाखाली निधीची तरतूद करुन विदर्भ व मराठवाडा विभागामध्ये कृषीपंप विद्युत जोडणी देण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.

२. विदर्भ व मराठवाडा विभागातील प्रलंबित कृषीपंपाच्या ऊर्जीकरणासाठी नवीन विशेष योजना म्हणून राबविण्यासाठी नवीन लेखाशिर्ष उघडून त्याखाली आवश्यक निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

   वरीलप्रमाणे सन २०१५-१६ पासून विदर्भ व मराठवाडा विभागात दिलेल्या व द्यावयाच्या कृषीपंपाची संख्या व त्याकरिता लागणाऱ्या निधीचा तपशिल सोबतच्या परिशिष्ट- "अ" व "ब" मध्ये देण्यात आला आहे.

३. सदर विभागामध्ये कृषीपंप वीज जोडणीची कामे महावितरण कंपनीमार्फत करण्यात येत असल्याने/ करावयाची असल्याने त्या प्रयोजनार्थ शासनाकडून महावितरण कंपनीस आवश्यक अनुदान देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर विशेष योजनेकरिता सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात "कृषीपंपाचा प्रादेशिक असमतोल दूर करणे" (लेखाशिर्ष क्र.२८०१२६८९) या लेखाशिर्षाखाली मंजूर व उपलब्ध असलेला रुपये २६६.०० कोटी एवढा निधी महावितरण कंपनीस वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. सदर विशेष योजनेसाठी, सन २०१७-१८ यावर्षाकरिता विभागाकडे उपलब्ध असलेला रुपये १५४.७४ कोटी एवढा शिल्लक नियतव्यय आगामी विधीमंडळ अधिवेशनात पुरवणी मागणीव्दारे अर्थसंकल्पित करुन तो वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौ.संदर्भ क्र.१८८/१७/व्यय-१६ दिनांक १३.०९.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१७१०३११८०४०९९२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhimashankar Yallappa Manta

Digitally signed by Bhimashankar Yallappa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries,Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873ce9a279d9561ff0cbf658e05b823c67c79dcac309fc4ebdac035d6aeec2a0, cn=Bhimashankar Yallappa Manta
Date: 2017.10.31 17:59:05 +05'30'

(भि. य.मंता)
शासनाचे उप सचिव

प्रत:

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, विधानभवन, मुंबई.

५. मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मंत्रालयीन विभाग
९. सचिव,महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर नं. १, १३वा मजला,कफ परेड, मुंबई ०५.
१०.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
११.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
१२.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी, प्रकाशगंगा, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
१३.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर
१४.महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
१५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१६.निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१७.अवर सचिव (ऊर्जा-३), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८.कक्ष अधिकारी, (अर्थसंकल्प/व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१९.निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०.ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.

परिशिष्ट - अ

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क्र.४५/ऊर्जा-५ दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ चे सहपत्र

विदर्भ व मराठवाडयातील नवीन कृषीपंपांना वीजजोडणी देण्याबाबत योजना (रु. ८१९ कोटी)

अ. क्र.	जिल्हयांचे नावे	कृषीपंपाच्या विद्युतीकरणाचा प्रादेशिक असमतोल दूर करणे या लेखाशिर्ष (२८०१२६८९) अंतर्गत जिल्हानिहाय निधी व प्रस्तावित कामे		सन २०१५-१६ या वर्षात मार्च २०१६ अखेर एकुण साध्य	सन २०१६-१७ या वर्षात जानेवारी २०१७ अखेर एकूण साध्य	एकुण साध्य
		मंजुर निधी (रु.कोटीमध्ये)	प्रस्तावित कृषीपंप वीजजोडण्या (संख्या)			
१	२	३	४	५	६	७ = ५ +६
१	बुलढाणा	८४	१०२७४	८८१७	२२२८	११०४५
२	अकोला	६७	७६५७	३०७७	१२९१	४३६८
३	वाशिम	२९	३७०४	१८६९	३१७	२१८६
४	अमरावती	९८	११०४४	८६४०	१०१७	९६५७
५	यवतमाळ	५७	७५३५	६१८२	२३६५	८५४७
६	नागपूर	४३	३९११	४३८५	१२३३	५६१८
७	वर्धा	३२	४०१२	१६२०	५७७	२१९७
८	भंडारा	२८	१३११	११६६	९९४	२१६०
९	गोंदिया	२१	१८०१	२२८५	१०	२२९५
१०	चंद्रपूर	--	--	--	--	--
११	गडचिरोली	--	--	--	--	--
	विदर्भ	**४५९**	**५१२४९**	**३८०४१**	**१००३२**	**४८०७३**
१	परभणी	५०	२०५३	२३२५	२८६९	५१९४
२	हिंगोली	२७	२७	१४२२	२०५९	३४८१
३	नांदेड	२९	६६७	२२८६	६२९	२९१५
४	बीड	४०	८२९५	४५९७	११२३	५७२०
५	उस्मानाबाद	५८	७४५४	६७६४	१९५०	८७१४
६	लातूर	५०	५४९५	३९५८	१९५५	५९१३
७	औरंगाबाद	६३	२५७३	२१९८	१८२२	४०२०
८	जालना	४३	२९१६	४३०९	११६७	५४७६
	मराठवाडा	**३६०**	**२९४८०**	**२७८५९**	**१३५७४**	**४१४३३**
	एकूण	**८१९**	**८०७२९**	**६५९००**	**२३६०६**	**८९५०६**

परिशिष्ट - ब

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क्र.४५/ऊर्जा-५ दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ चे सहपत्र

विदर्भ व मराठवाडयातील नवीन कृषीपंपांना वीजजोडणी देण्याबाबत योजना (रु. ९१६.२० कोटी)

अ. क्र.	जिल्हयांचे नाव	प्रस्तावित कृषीपंपांची संख्या	आवश्यक पायाभूत सुविधा			आवश्यकनिधी (रु.कोटीमध्ये)
			वितरण रोहित्रे	उच्चदाब वाहिनी	लघुदाब वाहिनी	
१	२	३	४	५	६	७
१	अकोला	८६१२	८६१	४३१	१२६६	८३.५९
२	अमरावती	१४०११	१४०१	७०१	२०६१	१३५.५९
३	बुलढाणा	१४२११	१४२१	७११	२०९०	१३७.७८
४	वाशिम	४७२७	४७३	२३६	६९५	४५.६९
५	यवतमाळ	९२२२	९२२	४६१	१३५६	८९.८१
६	वर्धा	७८०९	७८१	३९०	११४८	७५.६८
७	नागपूर	३८६७	३८७	१९३	५६९	३८.००
८	भंडारा	१५३५	१५४	७७	२२६	१५.००
९	गोंदिया	४२१८	४२२	२११	६२०	४१.००
१०	चंद्रपूर	१८३७	१८४	९२	२७०	१८.००
११	गडचिरोली	५९८	६०	३०	८८	६.००
विदर्भ		**७०६४८**	**७०६५**	**३५३२**	**१०३८९**	**६८६.१४**
१२	औरंगाबाद	५०९६	५१०	२५५	७४९	४९.००
१३	जालना	१५१३	१५१	७६	२२२	१४.००
१४	बीड	५९९८	६००	३००	८८२	५८.२५
१५	लातूर	२६१०	२६१	१३१	३८४	२४.८१
१६	उस्मानाबाद	२५१४	२५१	१२६	३७०	२४.००
१७	नांदेड	३१३०	३१३	१५७	४६०	३१.००
१८	परभणी	१६०३	१६०	८०	२३६	१६.००
१९	हिंगोली	१३५०	१३५	६७	१९८	१३.००
मराठवाडा		**२३८१४**	**२३८१**	**११९१**	**३५०२**	**२३०.०६**
एकूण		**९४४६२**	**९४४६**	**४७२३**	**१३८९१**	**९१६.२०**